# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड

*(महाराष्ट्र शासनाची स्वायत संस्था)*

विदयानगर कराड ४१५ १२४ जि. सातारा

फोन नं. (०२१६४) ३२६६३२, २७२४१४/१५ फॅक्स नं.(०२१६४) २७१७१३

**संकेतस्थळ :** www.gcekarad.ac.in **Email:** principalgcekarad@gmail.com

जा.क्रं.शाअमक/विवि/2019/302

दिनांक - 20/12/2019

# सुचना

**विषय - दुष्काळ परिस्थिती तसेच "क्यार" व "महा" चक्रीवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील शेतक-यांचे पाल्य असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.**

संदर्भ :- 1.संचालनालयाचे पत्र 2 अ/एडीएम/2019/864 दि.29/11/2019.

2. महसुल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक-एससीवायएच-2019/प्र.क्र.220/म-7 दि.21/11/2019.
3. महसुल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक-सीएलएस-2019/प्र.क्र.191/म-3 दि.18/11/2019.
4. मा.सहसंचालक. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे यांचे पत्र क्र.जा.क्र.तंशिविकापु/विवि/परीक्षा शुल्क /2019/4983, दि.03/12/2019 रोजीचे पत्र

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, सन 2019-20 मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क भरले आहे.अशा विद्यार्थ्यांना वरील शासन निर्णय प्रमाणे 50% अथवा 100% परीक्षा शुल्क माफ होणार आहे. या सवलतीचा लाभ केवळ आर्थीकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यापुरता मर्यादित राहिल. राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेखालील शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना 50% इतकी रक्कम शिष्यवृत्तीच्या स्वरुपात देण्यात येत असल्याने, या योजनेखाली परीक्षा शुल्काच्या केवळ 50% इतकी रक्कम माफ करण्यात येईल. तसेच रुपये 8 लाख पर्यंत कुटुबांचे वार्षिक उत्पन्न असलेल्या उर्वरीत विद्यार्थ्यांना 100% परीक्षा शुल्काची रक्कम माफ करण्यात येईल. तरी वरील अनुषंगाने पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी आपला अर्ज डिन / विद्यार्थी विभागात दि.31/12/2019 पर्यंत जमा करावा.

तसेच विहीत मुदतीत अर्ज सादर न केल्यास व सदरच्या सवलतीपासून वंचित राहिल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी संबंधीत विदयार्थ्यांची राहील याची नोंद घ्यावी.

प्राचार्य,<br>
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,कराड

प्रत :- 1) सर्व सूचना फलकांवर लावणेसाठी.(मार्फत विभाग प्रमुख)

2) संस्थेच्या संकेत स्थळावर अपलोड करणेकरीता.